# Sahaj Adhyayan (सहज अध्ययन)

जर हे Practice Question Papers तुम्हाला खरंच फायदेशीर वाटत असतील तर तुमच्या सर्व मित्र मैत्रिणींना पाठवा.

त्यांना देखील ह्या सर्वांचा अभ्यासासाठी फायदा होऊ द्या.

For more study material connect with us on

**Instagram**: www.instagram.com/sahajadhyayan

**YouTube (मराठी माध्यम):** www.youtube.com/sahajadhyayan

**YouTube (Semi/English):**

www.youtube.com/SahajAdhyayanSemiEnglish

**Telegram** (for PDF): t.me/sahajadhyayan

**Facebook**: www.facebook.com/sahajadhyayan

**WhatsApp** (only Message, No calls): **855 289 2890**

CƻǊ ϓƻǊŜ ǎǘǳŘȅ ϓŀǘŜǊƛŀƭ ǾƛǎƛǘΥ ƻǳǊ

ǁǁǁΦǎŀƘŀƧŀŘƘȅŀȅŀƴΦŎƻƳ

**जर तुमच्या जवळ कोणत्याही इयत्तेच्या, कोणत्याही परीक्षेच्या, कोणत्याही विषयाचे, Question Papers असतील**

**तर ते आम्हाला WhatsApp वर पाठवा,**

**इतर विद्यार्थी मित्रांना त्या सर्वांचा उपयोग होईल.**

This Question paper shared by Hitesh from JalgaonThanks Hitesh.

[redacted] धरणगांव जि.जळगांव

सहामाही परिक्षा २०२१-२२

विषय:- मराठी | वेळ:-२ता.३०मि

इ.११वी कला,वाणिज्य,विज्ञान | गुण:- ५०

कृती - १)अ)खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेप्रमाणे कृती करा.

1) बहिणाबाईंच्या काव्याचा अविष्कार [ सुभाषित ] २

2) जन्मदात्याला जो भोवतो त्याला [ लेक ] म्हणू नये.

२) खालील कृती सोडवा. २

1)




ii) मानवी जीवनाचे रहस्य.

शेतामध्ये कापणी चालो, मळणी चालो किंवा उफणणी चालो, काव्याने बहिणाबाइची पाठ कधी सोडली नाही. खळ्यात बैलाची पात सुरु झाली आणि मेढ्याभोवती बैल गरागरा फिरु लागला, की लागलेच ते त्या बैलाला गोंजारायला:

पाय उचल रे बैला,
कर बापा आता घाई
चालू दे रे रगडनं
तुझ्या पायाची पुन्याई

शेतकऱ्याचे जीवन म्हणजे कष्टाचे . शेतकऱ्याची हाडे अखेर शेतातच मोडावयाची अन् त्याची राख तापीमाईतच पडावयाची ह्याची बहिणाबाईंना जाणीव होती.

भोळ्या , भाविक, कष्टाळू आणि समाधानी शेतकऱ्याच्या संसाराचे करुन काव्य बाळबोध आणि जिवंत जिव्हाळ्याने बहिणाबाईच्या या गाण्यातून प्रगट झालेली आढळून येईल.

मात्र , बहिणाबाईच्या काव्याचे एवढेच वैशिष्ट नाही. मानवी जीवनाकडे एक स्पष्ट आणि प्रभावी तत्वज्ञान त्यांच्याजवळ होते. एखादया बुदधिमान, तत्त्वज्ञानी किंवा महाकवींची जणूकाही प्रतिभाच त्यांना प्राप्त झालेली होती. म्हणून त्यांच्या काव्याचा सर्व अविष्कार सुभाषितांचा आहे आणि त्याचा आत्मा उपरोधी विनोदाचा आहे.

मराठी वाङ्मयात अमर होतील अशी अनेक सुभाषिते जागोजाग त्यांच्या काव्यात विखुरलेली आढळतील. 'कशाला काय म्हणू नाही?' या काव्यात अशा सुभाषितांचे जणूकाही एक शेतच पिकलेले आहे, ' ज्यातून कापूस येत नाही त्याला बोंड म्हणू नये, भुकेल्या पोटी जी माणसाला निजवते तिला रात म्हणू नये, अन् दानासाठी जो आखडला जातो त्याला हात म्हणू नये. इमानाला जो विसरला त्याला नेक म्हणू नये अन् जन्मदात्यला जो भोवतो त्याला लेक म्हणू नये. जिच्यामध्ये भाव नाही तिला भक्ती म्हणू नये अन् जिच्यामध्ये चव नाही तिला शक्ती म्हणू नये' ह्या बहिणाबाईंच्या उद्गारांत भाषेची आणि विचारांची केवढी देदिप्यमान श्रीमंती प्रकटलेली आहे!

महाकवी झाला तरी तो ह्या पेक्षा अधिक काय आणखी बोलू शकतो.

३) स्वमत ४

१) शेतकऱ्यांचे जीवन म्हणजे कष्टाचे हा विचार तुमच्या शब्दात स्पष्ट करा.

किंवा

२) बहिणाबाईंच्या काव्यातील भाषेची वैशिष्टे लिहा.

Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

कृती १ आ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.

१) शाळेचा एक अवयव ☐

२) चैतन्याचे छोटे कोंब ☐

'घण् घण् घण् !' थोराड घंटेचे टोलांवर टोल पडत राहतात. चैतन्याचे छोटे कोंब उड्या घेत वाड्याच्या प्रार्थनामंदिराकडं एकवटू लागतात. समाधानी चर्येनं मामू स्टुलावरुन खाली उतरतो.

रांगा धरुन उभे राहिलेले अनघड, कोवळे कंठ जोडल्या हातांनी आणि मिटल्या डोळ्यांनी भावपूर्ण सुरात प्रार्थनेतून अज्ञात शक्तीला आळवू लागतात.

मामू एका दगडी खांबाला रेलून आपली धुनेवाणाची सफेद दाढी कुरवाळत ती समूह प्रार्थना ऐकत राहतो. त्याचं मन कशात तरी गुंतून पडंत.

प्रार्थना संपते. 'जनगणमन' ची इशारत मिळते खांबाला रेललेला मामू पाय जोडून सावधानचा पवित्रा घेऊन खडा होतो.

या शाळेचा मामू एक अवयव झालाय. गेली चाळीस वर्षे तो आपल्या अलिबाबांच्या हातानं घंटेचे टोल देत, असे चैतन्याचे कोंब नाचवत आलाय. कोल्हापूर संस्थान होतं तेव्हा राजाराम महाराजांच्या कारकिर्दीतील मामूची नेमणूक आहे. त्यानं दोन राज्य बघितली संस्थानाचं आणि लोकशाहीचं. कोल्हापूरकरांच्या वैक पिढ्या बघितल्या.

२) 'मामू' या पाठाचे भाषिक वैशिष्ट्ये स्पष्ट करा. २

किंवा

मामूचे व्यक्तिमत्व स्पष्ट करा.

कृती - २ अ) खालील कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. २

१) 'पहाटी' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

२) अनोळख्याने हा शब्द कोणासाठी वापरला आहे.

अनोळख्याने ओळख कैशी
गतजन्मींची द्यावी सांग;
कोमल ओल्या आठवणींची
एथल्याच जर बुजली रांग!
तळहाताच्या नाजुक रेषा
कुणिं वाचाव्या, कुणी पुसाव्या;
तांबुस निर्मल नखांवरी अन्
शुभ्र चांदण्या कुणिं गोंदाव्या!
दवांत आलीस भल्या पहाटी
अभ्रांच्या शोभेंत एकदा:
जवळुनि गेलिस पेरित अपुल्या
मंद पावलांमधल्या गंधा.

२) खालील अर्थाच्या ओळी कवितेतून शोधून लिहा. (२)

१) वर्तमानातील ताज्या आठवणीच जर विरुन घालल्या असतील तर अनोळखी झालेल्या गतकाळातील प्रेमाची आता तरी कशी द्यावी.

Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

This Question paper shared by Hitesh from JalgaonThanks Hitesh.

Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan



योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा. १

१) अभ्रांच्या शोभेत एकदा म्हणणे.

१) काळ्या मेघांप्रमाणे २) आकाशत अल्पकाळ शोभून दिसणाऱ्या ढगांप्रमाणे.

३) आकाशात गरजणाऱ्या ढगांप्रमाणे.

३) स्वमत/अभिव्यक्ती. ४

'दवांत आलिस भल्या पहाटी' या कवितेत तुम्हाला जाणवलेले वेगळेपण स्पष्ट करा.

किंवा

प्रेमातील परस्परविरोधी भावनांचे धागे गुंफून हळव्या मन:स्थितीचे चित्रण कवितेत कसे व्यक्त झाले हे स्पष्ट करा.

कृती -२ आ) खालील कृतींतून मिळणाऱ्या संदेश कवितेच्या आधारे लिहा. (२)

| निसर्गातील घटकांच्या सोबतीने केलेली कृती | |
|---|---|
| १) कोकीळ होऊनी गाऊ.......... <br> २) गाण्यात ऋतूच्या आपण चल खळाळून रे वाहू.................... | |

झाडांच्या मनात जाऊ, पानांचे विचार होऊ
पोपट स्पंदनासाठी, कोकीळ होऊनी गाऊ...

बहरात वसंतामधल्या , तो सूर सावळा ऐकत
जातील फुलेही रंगून, जन्माला अत्तर घालत
चल सुराबरोबर आपण , तो फाया कानी ठेवू...

खेळून रंगपंचमी, फुलपाखरे भिजली सारी
हा थवा असे रंगीत की पताकाच फिरणारी
हे भिरभिरणारे तोरण दाराला आणून लावू...

ही कोणाची रे करणी डोळ्यांत झऱ्याचे पाणी
हे उधान आनंदाचे की देवघराची गाणी
गाण्यात ऋतूच्या आपण चल खळाळून रे वाहू...

पाण्यात उतरुनी माझे, मन खडकावर बसताना
थुई थुई नाचरे पाणी, मज दिसते रे हसताना
एक रोप तुषाराचे मज, मायेने घाली न्हाऊ...

ओंजळीमध्ये मी अलगद, आकाश जरासे धरता
आकाशाने मी अवघ्या पाण्याची ओटी भरता
हातात ऊन दुचमळते नि सूर्य लागतो पोहू...

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

This Question paper shared by Hitesh from JalgaonThanks Hitesh.

Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan



हे फांदीवरले पक्षी की हंगामाचे साक्षी
झाडांच्या पायी काढी, सावली उन्हावर नक्षी
मग तिलाच फुटले पंख, नि त्यांचे झाले काज....

मानवी स्पर्श न जेथे, असतील फुले-पाखरे
रानात अशा तू मजला, ईश्वरा जरा टाक रे
मी झाड होऊनी तेथे, पसरीन आपुले बाहू....

२) 'तुम्ही झाडांच्या मनात शिरला आहात' अशी कल्पना करुन कल्पनाचित्र शब्दबध्द करा. २

किंवा

निसर्गातील घटक व मानवी जीवन यांचा परस्परसंबंध स्पष्ट करा.

**कृती - ३ खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनूसार कृती करा.** १

१) 'कृष्णराव' हे नाव ज्या भूमिकेवरुन पडले ती [ ] भूमिका व [ ] नाटक

२) कृष्णराव यांचे मूळ नाव [ ]

| | |
|---|---|
| मोनिका : | कृष्णराव, खूप आनंद झाला आपण इथे आलात म्हणून. पत्नींना स्टेजवर नाही आणलंत ? |
| कृष्णराव : | नको, तिला सवय नाही. लोकांसमोर घाबरी होते ती. शिवाय प्रखर दिव्यांची सुध्दा भीती वाटते तिला. तिला कंदिलाची सवय गावाला.... आमची गोष्ट वेगळी आहे. आम्ही नट मंडळी. आम्हांला कुठल्याही दिव्यांचं काही वाटत नाही. तो मघाचा फोटोचा दिवा मात्र सहन होत नाही. तो फाजील कार्टा इथे आला तर त्याला कानपटीन सांगतो. |
| मोनिका : | पुन्हा नाही येणार तो. कृष्णराव, आम्ही काही आपल्या भूमिका पहिलेल्या नाहीत. आपल्या भूमिकांविषयी सांगा ना आम्हांला. |
| कृष्णराव : | (हातातली काठी माईक समजून) सांगतो हं. भूमिका तशा मी खूप केल्यात. हॅलो हॅलो(चूक लक्षात येते. काठी बाजूला करुन) गडकऱ्यांच्या, खाडिलकराच्या, देवलांच्या नाटकात. पण माझी विशेष गाजलेली भूमिका म्हणजे–कृष्णाची. |
| मोनिका : | सौभद्र मधली.... |
| कृष्णराव : | हो. सौभद्र नाटकातला कृष्ण. अहो, त्यावरुन मला कृष्णराव नाव पडलं. गोपाळ गणेश आगरकरांनी दिलं. म्हणजे टिळकांनी नारायण राजहंसाला बालगंधर्व नाव दिल्याचं आगरकरांना कळलं. दोघांमध्ये मतभेद होते. तावडतोब आगरकरांनी मला कृष्णराव नाव देऊन टाकलं. टिळकांना कळायच्या आत. 'सुधाकर' पत्रामध्ये अग्रलेख लिहिला. लोकहो याला कृष्णराव म्हणा. माझं मूळचं नाव विठू. |
| मोनिका : | सौभद्रचे किती प्रयोग केलेत ? |

**२)स्वमत / अभिव्यक्ति**

१) कृष्णरावांच्या संवादातून स्पष्ट झालेली त्यांच्या पत्नीची स्वभाववैशिष्ट्ये लिहा. ४

२) प्रस्तुत नाट्यउताऱ्यावरुन कृष्णरावांचे व्यक्तिचित्रे रेखाटा.

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

This Question paper shared by Hitesh from JalgaonThanks Hitesh.

Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE.    Contact us: @SahajAdhyayan



मराठी ११ वी

कृती - ४ पुढील कृती सोडवा (कोणतेही २)

१) सूत्रसंचालक एक चलयाचित व्यवसाय आहे. स्पष्ट करा

२) मुद्रितशोधन व व्याकरण यांचा सहसंबंध सविस्तर लिहा.

३) मुद्रितशोधाकाच्या भुमिकेत आजच्या काळीतील महत्व तुमच्या शब्दात लिहा.

कृती - ५ सूचनेनुसार सोडवा.

१) आपणच आपली वाट निर्माण करावी या वाक्यातील शब्दशक्ती लिहा.

अ) अभिधा    ब) लक्षणा    क) व्यंजना

२) हा किल्ला बुलंद आहे या वाक्यातील शब्द शक्ती लिहा.

अ) अभिधा    ब) लक्षणा    क) व्यंजना

३) यात काही राम नाही (शब्दशक्ती लिहा)

अ) अभिधा    ब) लक्षणा    क) व्यंजना

खालील उदाहरणांमधील काव्यगुण ओळखा.

१) खरा तो एकचि धर्म जगाला प्रेम अर्पावे

अ) प्रसाद    ब) ओज    क) माधुर्य

२) पराक्रमी व्यक्ती रणांगणावर येणाऱ्या मृत्यूला घाबरत नाही.

अ) करुणा    ब) पराक्रम    क) उदारता

३) आता उठवू सारे रान आता पेटवू सारे रान शेतकऱ्यांच्या राज्यासाठी लावू पणाला प्राण.

अ) प्रसाद    ब) ओज    क) माधुर्य

खालील वाक्यातील संयुक्त, मिश्र व केवल वाक्य असे वर्गीकरण करा.

१) मी माणसे मोजून पाहिली, पण ती आठच भरली

२) मुले बागेत खेळली, ती खूप दमली.

सूचनेनुसार वाक्यसंश्लेषण करा.

१) श्याम घरी आला. वादळाला सुरुवात झाली. ( मिश्र वाक्य करा.)

२) तो उत्तीर्ण झाला. सर्वांना आनंद झाला (केवल वाक्य करा.)

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp...  Hi